कृष्णराव सीताराम देसाई शिक्षण मंडळ संचलित

# स. का. पाटील सिंधुदुर्ग महाविद्यालय, देशभक्त कै. शंकरराव गवाणकर सायन्स कॉलेज आणि रामभाऊ परुळेकर कनिष्ठ महाविद्यालय मालवण.

(स्थापना १९१४) (रजि.-एफ-१०)

मालवण तालुक्यातील उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करुन द्यावी व त्यांचा सर्वांगीण विकास साधता यावा, या हेतूने कृ. सी. देसाई शिक्षण मंडळाने १९६५ साली स. का. पाटील सिंधुदुर्ग महाविद्यालय सुरु केले. तसेच १९७५ साली कला आणि वाणिज्य विभागाचे कनिष्ठ महाविद्यालय सुरु केले. सन २०१६-१७ पासून सायन्स कॉलेज सुरु केले.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या अधिकाधिक सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी संस्था सातत्याने प्रयत्नशील आहे. शैक्षणिक संस्थेचे आणि विद्यार्थ्यांचे सुयश हे संस्था, शिक्षक, विद्यार्थी आणि पालक यांच्यातील सुसंवादावरच अवलंबून असते. त्यासाठी या महाविद्यालयात दिले जाणारे शिक्षण, राबविले जाणारे विविध उपक्रम, प्रवेश पात्रता, परीक्षा इत्यादी संबंधीत सविस्तर माहिती देणारी ही 'माहिती पुस्तिका' विद्यार्थी व पालकांनी समजून घ्यावी. तसेच शिस्त व नियमांच्या चौकटीत राहून विद्यार्थ्यांनी शैक्षणिक व सहशैक्षणिक सुविधांचा अधिकाधिक लाभ घ्यावा.

> मुंबई विद्यापीठ परिपत्रक क्र. APD/Misc/265 of २००१ दि. ४ ऑगस्ट २००५ नुसार
> महाविद्यालय परिसरात रॅगिंगला प्रतिबंध आहे.
> त्यात सहभागी होणारा विद्यार्थी कायद्यानुसार महाविद्यालयातून काढून
> टाकण्यासारख्या शिक्षेस पात्र ठरेल याची नोंद घ्यावी.

## अ) कनिष्ठ महाविद्यालय

**१) शिक्षणक्रम** - ११ वी कला व वाणिज्य
१२ वी कला व वाणिज्य — वेळ : स. ८.०० ते दु. २.४०

**२) प्रवेश पात्रता नियम -**

* महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाची शालांत परीक्षा (१० वी) उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना ११ वीत प्रवेश मिळेल.
* भारतातील किंवा इतर कोणत्याही स्टॅट्युटरी मंडळाची शालांत परीक्षा (इंग्रजी विषयासह) उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना ११ वीत प्रवेश मिळेल. अशा विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षणमंडळाचे 'पात्रता प्रमाणपत्र' सादर करणे आवश्यक आहे.
* अन्य महाविद्यालयातून ११ वी उत्तीर्ण होऊन येणाऱ्या विद्यार्थ्यांनी तसा दाखला आणल्यास १२ वीत प्रवेश मिळेल. (स्थानिक स्थलांतरास प्रवेश मिळणार नाही.)

**३) प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे/दाखले :-**

१) प्रवेश अर्ज
२) विद्यार्थ्यांचे आधार कार्डाची २ सत्यप्रत
३) शाळा सोडल्याचा मूळ दाखला व त्याच्या तीन प्रमाणित प्रती

४) १० वी/११ वी उत्तीर्ण झाल्याचे मूळ गुणपत्रक व त्याच्या तीन प्रमाणित प्रती

५) विद्यार्थ्यांच्या स्वत:च्या जातीच्या दाखल्याच्या दोन प्रमाणित प्रती

६) शासकीय सवलत घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी पूर्वी सवलत मिळत असल्याचा आधीच्या संस्थेचा दाखला प्रवेश अर्जासोबत जोडावा.

४) **शैक्षणिक व इतर शुल्क (फी)**

**कनिष्ठ महाविद्यालय शुल्क रचना**

**(अनुदानित अभ्यासक्रम)**

| | इयत्ता ११ वी कला व वाणिज्य | इयत्ता १२ वी कला व वाणिज्य |
|---|---|---|
| शिक्षण फी | रू. १९२-०० (मासिक रू. १६/-) | रू. २१६-०० (मासिक रू. १८/-) |
| प्रवेश फी | रू. १६-०० | रू. १८-०० (नविन विद्यार्थ्यास) |
| सत्र फी | रू. ३२-०० (प्रतिसत्र रू. १६/-) | रू. ३६-०० (प्रतिसत्र रू. १८/-) |
| परीक्षा फी | रू. २५-०० | |
| अनामत | रू. २०-०० | |
| स्नेहसंमेलन व मॅगेझीन | रू. १००-०० | रू. १००-०० |
| ओळखपत्र व ग्रंथालय | रू. ५०-०० | रू. ५०-०० |
| इतर फी | रू. ३०-०० | रू. ३०-०० |
| एकूण फी | रू. ४६५-०० | रू. ४५०-०० |

**प्रवेश घेताना**

| | ११ वी | १२ वी |
|---|---|---|
| **१) फी भरणाऱ्यांसाठी** | रू. ४६५-०० | रू. ४५०-०० |
| **२) फी माफी धारकांसाठी** | रू.२२५-०० | रू. १८०-०० |

## परीक्षा विषयक नियम

* ११ वी च्या वार्षिक परीक्षेचा निकाल गृहपाठ, वर्गपाठ, सहामाही व वार्षिक लेखी परीक्षा, तोंडी परीक्षा, प्रोजेक्ट इ. च्या एकत्रित गुणांवरून लावला जातो.
* गृहपाठ, वर्गपाठ वेळेत पूर्ण न केल्यास तसेच आवश्यक तितकी उपस्थिती न भरल्यास वार्षिक परीक्षेला बसू दिले जाणार नाही.
* १२ वी च्या विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढावी यासाठी काही विषयांच्या मासिक चाचणी परीक्षा घेतल्या जातील. अशा चाचणी परीक्षा, सहामाही व पूर्व परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या आणि आवश्यक उपस्थिती पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना १२ वी च्या परीक्षेला बसण्याची परवानगी देण्यात येईल.

## ब) वरीष्ठ महाविद्यालय

१) शिक्षणक्रम : वेळ : स. ८.०० ते दु. २.१०

१) कला स्नातक (बी. ए.) प्रथम वर्ष, व्दितीय वर्ष व तृतीय वर्ष कला.

२) वाणिज्य स्नातक (बी. कॉम.) प्रथम वर्ष, व्दितीय वर्ष व तृतीय वर्ष वाणिज्य.

३) B. Sc. प्रथम वर्ष, व्दितीय वर्ष, तृतीय वर्ष

२) प्रवेश पात्रता नियम :

* १२ वी कला /वाणिज्य/शास्त्र शाखेतून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना कला शाखेच्या प्रथम वर्षात प्रवेश देण्यात येईल.
* १२ वी वाणिज्य/शास्त्र शाखेतून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना वाणिज्य शाखेच्या प्रथम वर्षात प्रवेश देण्यात येईल.
* १२ वी विज्ञान - उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना विज्ञान शाखेच्या प्रथम वर्षात प्रवेश देण्यात येईल.

३) प्रवेश अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे/दाखले :

१) कनिष्ठ महाविद्यालय/उच्च माध्यमिक विद्यालय सोडल्याचा मूळ दाखला आणि त्याच्या तीन प्रमाणित प्रती.

२) विद्यार्थ्याचे स्वत:चे आधारकार्डाची २ सत्यप्रत.

३) १० वी (एस.एस.सी.)गुणपत्रिकेच्या २ प्रमाणित प्रती.

४) १२ वी च्या गुणपत्रिकेची मूळ प्रत व चार प्रमाणित प्रती.

५) विद्यार्थ्यांच्या स्वत:च्या जातीच्या दाखल्याच्या २ प्रमाणित प्रती.

६) पूर्वीच्या संस्थेत शासकीय सवलती घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी तशी सवलत मिळत असल्याचा, त्या संस्थेचा दाखला प्रवेश घेताना जोडणे आवश्यक आहे.

७) पासपोर्ट साईज ३ फोटो.

टीप - शाळा सोडल्याच्या दाखल्याची मूळप्रत परत दिली जाणार नाही. अगर त्याची प्रमाणित प्रत महाविद्यालयाकडून तयार करून दिली जाणार नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज भरण्यापूर्वीच दाखल्याच्या किमान प्रमाणित प्रती काढून घ्याव्यात.

८) महाराष्ट्र राज्याबाहेरील उच्च माध्यमिक परीक्षा उत्तीर्ण झालेल्यांसाठी पूर्वीच्या परीक्षा महामंडळाचा 'स्थलांतर' दाखला.

९) मुंबई विद्यापीठाशी संलग्न नसलेल्या महाविद्यालयातून प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्याला स्थलांतर दाखला (Migration Certificate)

१०) मुंबई विद्यापीठाशी संलग्न असलेल्या अन्य महाविद्यालयातून या महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्याला त्याच्या अभ्यासावयाच्या विषयाच्या अध्यापनाची सोय असेल तरच प्रवेश मिळेल. असा प्रवेश घेताना विद्यार्थ्याने १) पूर्वीच्या महाविद्यालयाकडून ना हरकत प्रमाणपत्र (No Objection Certificate) सादर करावे लागेल. २) महाविद्यालयात मिळणाऱ्या नमुन्यात पूर्वीच्या महाविद्यालयाकडे स्थलांतर दाखला (Transfer Certificate) मिळण्यासाठी अर्ज करावा लागेल.

४) शुल्क रचना व नियम :

| प्रवेश घेताना | प्रथम वर्ष | व्दितीय वर्ष | तृतीय वर्ष |
|---|---|---|---|
| फी भरणाऱ्यांसाठी | ३५३०.०० | २९६०.०० | २९६०.०० |
| फी माफी धारकांसाठी | २६८५.०० | २११५.०० | २११५.०० |

प्रतीसत्र परीक्षा फी = रू. ६६०/- (रू. ६००/- + रू. ५०/- + रू. १०/-)

-: महत्त्वाची सूचना :-

१) शुल्क वाढ झाल्यास नियमानुसार वाढीव शुल्क भरावे लागेल.
२) शुल्क भरण्याच्या मुदतीच्या तारखेपूर्वी शुल्क भरावे लागेल.
३) शुल्क भरल्यानंतर त्याची पावती प्रत्येक विद्यार्थ्याने घ्यावी.

५) महाविद्यालयाची वेळ – रविवार व्यतिरिक्त इतर दिवशी महाविद्यालयाची वेळ सकाळी ८.०० ते दुपारी २.१० असेल. रविवार हा साप्ताहिक सुट्टीचा दिवस असेल. कनिष्ठ महाविद्यालयाची वेळ सकाळी ८.०० ते दु. २.०० वाजेपर्यंत असेल.

६) अध्यापनाचे माध्यम :- कला शाखेसाठी मराठी आणि वाणिज्य शाखेसाठी मराठी व इंग्रजी आणि विज्ञान शाखेसाठी इंग्रजी माध्यम असेल.

७) सत्र कालावधी :- प्रथम सत्र -
द्वितीय सत्र -

८) सत्र मंजुरी नियम :-

मुंबई विद्यापीठाच्या सत्र मंजुरी नियम क्र. ११९ व १२५ प्रमाणे विद्यार्थ्याने प्रत्येक सत्रात सर्व विषयाच्या तासाना किमान ७५ % उपस्थिती अनिवार्य आहे. ७५ % उपस्थिती व अभ्यासातील समाधानकारक प्रगती पाहून मा. प्राचार्यांनी सत्र मंजूर केल्यावरच विद्यार्थ्याला परीक्षेला बसू दिले जाईल. उपस्थिती व सत्र परीक्षा याबाबत कोणत्याही सबबीवर सवलत दिली जाणार नाही.

शैक्षणिक सवलत कनिष्ठ आणि वरिष्ठ विभागा करीता सूचना –

९) आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी राजश्री छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क माफ शिष्यवृत्ती

१) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांनी अर्ज ऑनलाईन पद्धतीने शासनाच्या http://mahadbtmahait.gov.in या संकेत स्थळावरती विहीत मुदतीत भरणे आवश्यक आहे.

२) ज्या विद्यार्थ्याच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न (एकत्रित) रु. २,५०,०००/- व त्यापेक्षा कमी आहे असा तहसिलदारांकडून उत्पन्नाचा दाखला मिळणे आवश्यक.

३) लाभार्थी विद्यार्थ्यांची नियमित उपस्थिती ७५% असणे अनिवार्य आहे.

४) सदर योजनेचा लाभ दोन अपत्यांपर्यंतच अनुज्ञेय असल्याने कुटुंब मर्यादा प्रमाणपत्र (दोन अपत्य) उपलब्ध असणे आवश्यक आहे.

५) संकेत स्थळावर माहिती भरण्याकरिता गुणपत्रिका, उत्पन्नाचा दाखला, आधारकार्ड, प्रवेश शुल्क पावती, शैक्षणिक खंड प्रमाणपत्र इ. आवश्यक.

सदर सवलती बाबतच्या सूचना वेळोवेळी सूचना फलकावर लावण्यात येतील.

१०) शिष्यवृत्त्या–

भारत सरकार मागासवर्गीय शिष्यवृत्ती अर्ज शासनाच्या http://mahadbtmahait.gov.in या संकेत स्थळावरती भरणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी. विविध प्रकारच्या शासकीय व निमशासकीय शिष्यवृत्यांचा लाभ विद्यार्थ्यांना मिळू शकतात. इच्छुक विद्यार्थ्यांनी वेळोवेळी सूचना फलकावर लावलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात. संबंधित विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्यावर कार्यालयाशी संपर्क साधावा. त्याना कार्यालयाकडून योग्य ते मार्गदर्शन केले जाईल. शिष्यवृत्ती मिळण्यासाठी अथवा मिळालेली शिष्यवृत्ती चालू राहण्यासाठी विद्यार्थ्याची नियमित उपस्थिती, अभ्यासातील समाधानकारक प्रगती, विविध उपक्रमातील सहभाग आणि चांगली वर्तणूक याबाबींचा विचार केला जाईल.

११) अनुसूचित जाती (SC), अनुसूचित जमाती (ST), विमुक्त जाती, भटक्या व विमुक्त जमाती (VJ/NT), विशेष मागासवर्गीय संवर्ग (SBC) :

* या प्रवर्गातील विद्यार्थ्यांकडून रू. २२० (वार्षिकांक, ग्रंथालय शुल्क, ओळखपत्र शुल्क, ग्रुप इन्शुरन्स, विद्यार्थी कल्याण निधी) भरून प्रवेश देण्यात येईल. प्रवेश अर्जासोबत जातीचा दाखला, पालकाच्या गतवर्षीच्या उत्पन्नाचा दाखला इत्यादी कागदपत्रे जोडणे बंधनकारक आहे.

* SC, ST, VJ, NT, SBC, OBC & MINORITY या प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी त्यांच्यासाठी असलेल्या शिष्यवृत्ती, शैक्षणिक सवलती इ. संबंधी वेळोवेळी येणारी शासन परीपत्रके सूचना फलकावर लावण्यात येतील. ती काळजीपूर्वक वाचून विद्यार्थ्यांनी कार्यालयाशी संपर्क साधावा.

* शिष्यवृत्ती अर्जाची पुर्तता प्रवेश घेतल्यापासून १५ दिवसांत करणे संबंधितांना बंधनकारक आहे.

* अपूर्ण अर्ज स्विकारला जाणार नाही.

**१२) शिष्यवृत्ती अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे –**

१) विद्यार्थ्याचा स्वत:चा जातीचा दाखला

२) मागील परीक्षेच्या गुणपत्रकाची सत्यप्रत

३) विद्यार्थ्याच्या वडिलांचा / आईचा गतवर्षीच्या उत्पन्नाचा दाखला

४) वडील /आई नोकरी करीत असल्यास, त्याठिकाणच्या गतवर्षीच्या पगाराचा दाखला

५) वडील/आई यांचे वार्षिक उत्पन्न १,००,००० पेक्षा अधिक असल्यास Non-Creamy Layer Certificate जोडणे बंधनकारक आहे.

६)वडील/आई हयात नसल्यास वडिलांचा/आईचा मृत्यू दाखला जोडणे आवश्यक आहे.

७) विद्यार्थ्याचे स्वत:च्या आधारकार्डाची २ सत्यप्रत.

**१३) महाविद्यालयातील वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रम –**

महाविद्यालयाचे वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रम प्रति वर्षी २३, २४ डिसेंबर रोजी होतील. कार्यक्रमाची वेळ सकाळी १०.०० ते दुपारी १.०० अशी राहील. ही वेळ कटाक्षाने पाळणे, हे सर्वांना बंधनकारक आहे.

**१४)ग्रंथालय** –विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी महाविद्यालयाने समृद्ध ग्रंथ भांडार उपलब्ध केलेले आहे. पाठ्यपुस्तकाव्यतिरिक्त, अवांतर वाचनाची पुस्तके, नियतकालिके, वृत्तपत्रे, जर्नल्स्, संदर्भग्रंथ, विविध विश्वकोष, शब्दकोष ग्रंथालयात उपलब्ध आहेत. पुस्तकांची देवाणघेवाण, अभ्यासिका, पुस्तकपेढी (Book Bank), ग्रंथालय ओळखपत्र, इत्यादीसाठी विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्यावर ग्रंथपालाशी संपर्क साधावा. आपली अनामत रक्कम कॉलेज सोडल्यापासून तीन वर्षेपर्यंत राहील. त्यानंतर नियमानुसार जप्त करुन लायब्ररी विकास फंडामध्ये वापर केला जाईल. ग्रंथालयाचे कामकाज Digital Library स्वरुपात प्रगत केले जात असून विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घ्यावा.

**१५) इतर उपक्रम –**

१) राष्ट्रीय सेवा योजना (National Service Scheme) :-

महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना हा सहशैक्षणिक उपक्रम विद्यार्थ्यांसाठी राबविला जातो. महाविद्यालयात प्रत्येकी ७५ स्वयंसेवकांची दोन युनिटस् कार्यरत आहेत. प्रथम वर्ष कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील विद्यार्थी–

विद्यार्थीनी यामध्ये प्रवेश घेऊ शकतात. प्रथम व द्वितीय वर्षात स्वयंसेवकांनी प्रतिवर्षी १२० तास कार्यभार पूर्ण करणे अपेक्षित आहे. N.S.S. च्या माध्यमातून निवासी श्रमसंस्कारशिबीर, लीडरशिप कॅम्प, आपत्कालीन व्यवस्थापन प्रशिक्षण, व्यक्तीमत्त्व विकास शिबीर, स्वच्छता अभियान, पर्यावरण रक्षण इत्यादी जिल्हा/राज्य/राष्ट्रीयस्तरावरील उपक्रमामध्ये सहभागाची संधी N.S.S. स्वयंसेवकांना मिळते. तसेच N.S.S. स्वयंसेवकांना वर्षाअखेर परीक्षेत १० गुण (Grace Marks) मिळतात. अशा या रोमांचक आणि आव्हानात्मक सहशैक्षणिक उपक्रमामध्ये सहभागी होऊन आपले अनुभवविश्व समृद्ध करण्याची संधी महाविद्यालय आपणांस देत आहे. प्रवेश घेतल्यानंतर विद्यार्थ्यांनी N.S.S. प्रकल्प अधिकाऱ्यांकडून N.S.S. चा प्रवेश अर्ज घ्यावा.

**२)एन.सी.सी.** (National Cadet Corps) : Boys Unit (5 MH/BN. Kolhapur)
Girls Unit (6 MH/BN. Kolhapur)

NCC बॉईज युनिट मधील कॅडेटस् (5 MH.BN, Kolhapur) मध्ये सहभागी होऊ शकतात. तर NCC गर्ल्स युनिट मधील कॅडेटस् (6 MH.BN, Kolhapur) मध्ये सहभागी होऊ शकतात. NCC च्या माध्यमातून कॅडेटस्च्या जीवनात स्वयंशिस्त, वक्तशीरपणा, कणखरपणा इत्यादी गुणांचा विकास होतो. 11 वी ते S.Y.B.A./B.Com/ BSC. पर्यंतच्या विद्यार्थ्यांना NCC मध्ये दोन वर्षासाठी प्रवेश घेता येतो. निरनिराळे Camps, परेड मध्ये कॅडेटस् सहभागी होऊ शकतात. NCC त सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना १० गुण (Grace Marks) मिळतात. तसेच कॅडेटस्ना विविध शिष्यवृत्यांचा लाभ मिळू शकतो. शासनाच्या पोलीस व संरक्षण क्षेत्रातील करिअरमध्ये NCC कॅडेटस्ना प्राधान्याने संधी उपलब्ध आहेत. महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर विद्यार्थ्यांनी Assistant NCC Officer (ANO) कडून NCC चा प्रवेश अर्ज घ्यावा.

**३) आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई.**

N.S.S. किंवा N.C.C. मध्ये सहभागी नसणारे विद्यार्थी रु. २००/- शुल्क भरुन मुंबई विद्यापीठाच्या 'आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागामध्ये' एक वर्षासाठी प्रवेश घेऊ शकतात. विविध सामाजिक समस्या, पर्यावरण विषयक समस्यांची विद्यार्थ्यांना जाणिव करुन देणे, हा या विभागाचा उद्देश आहे. अशा विषयांवर आधारीत विद्यार्थ्यांनी प्रकल्प सादर करणे आणि १२० तास काम करणे अपेक्षित आहे. अशा विद्यार्थ्यांना १० गुण (Grace Marks) मिळतात. महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर विद्यार्थ्यांनी या विभागाच्या केंद्र प्रमुखांशी संपर्क साधून प्रवेश अर्ज घ्यावा.

**४) महिला विकास कक्ष :-**

सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार 'विशाखा' मार्गदर्शक तत्वांवर आधारीत मुंबई विद्यापीठाच्या नियमान्वये कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळवणूकीस प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने महाविद्यालयात महिला विकास कक्ष कार्यरत आहे. लैंगिक छळवणूकी विरोधात महिला विकास कक्ष कार्यरत आहे. लैंगिक छळवणूकीविरोधात महिला विकास कक्षाच्या तक्रार निवारण समितीकडे तक्रार करता येते.

या कक्षाच्यावतीने 'जागर' हे मासिक भित्तीपत्रके चालविले जाते, तसेच कार्यशाळा व शिबीरे घेतली जातात. या उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा.

**५) क्रीडा विभाग :-**

क्रिडा विभागाच्या माध्यमातून विद्यार्थी कबड्डी, खो-खो, क्रिकेट, व्हॉलीबॉल, ॲथलेटीक्स्, रस्सीखेच यासह इतर अनेक क्रीडा प्रकारांच्या आंतर महाविद्यालयीन क्रीडास्पर्धामध्ये सहभागी होऊ शकतात. तसेच वार्षिक युवा महोत्सवाच्या दरम्यान क्रीडास्पर्धा आयोजित केल्या जातात. क्रीडा संघामध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या

विद्यार्थ्यांनी जिमखाना प्रमुखांशी संपर्क साधावा. क्रीडा स्पर्धा संबंधित सूचना फलकावर वेळोवेळी लावण्यात येतील. विद्यापीठ स्तरावरील खेळाडूंसाठी १० गुण (Grace Marks) मिळतात.

**६) सांस्कृतिक विभाग :-**

मुंबई विद्यापीठाच्यावतीने विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी आंतर महाविद्यालयीन सांस्कृतिक स्पर्धा प्रतिवर्षी आयोजित केल्या जातात. यामध्ये सांघिक तसेच वैयक्तिक अभिनय, नृत्य, गायन, वादन, ललितकला, साहित्यविषयक इत्यादी स्पर्धा प्रकारांचा समावेश होतो. इच्छुक विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक विभाग प्रमुखांशी संपर्क साधावा. विद्यापीठ स्तरावरील कलाकारांसाठी १० गुण (Grace Marks) मिळतात.

या व्यतिरिक्त महाविद्यालयात विविध सहशैक्षणिक तसेच शिक्षणबाह्य उपक्रम, कार्यक्रमांचेही आयोजन केले जाते, त्यामध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा.

**१६) विद्यार्थ्यांसाठी नियमावली व आचारसंहिता -**

महाविद्यालयामध्ये शिस्तीचे वातावरण राहावे व शैक्षणिक सुविधांचा सर्वांना अधिकाधिक लाभ घेता यावा यासाठी महाविद्यालय प्रशासनाने केलेल्या पुढील नियमांचे पालन करणे, सर्वांसाठी बंधनकारक आहे.

१) महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर प्रत्येक विद्यार्थ्याने आपले ओळखपत्र स्वत:सोबत ठेवणे आवश्यक आहे. प्राचार्य, प्राध्यापक व कर्मचारी यांनी मागणी केल्यास विद्यार्थ्यांनी ओळखपत्र दाखविणे बंधनकारक आहे.

२) तासिका सुरु असताना विद्यार्थ्यांनी व-हांड्यात अथवा महाविद्यालयाच्या परिसरात फिरु नये सहाध्यायींना व इतर वर्गांना आपल्या वर्तनाने कोणताही त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी.

३) महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांव्यतिरिक्त कोणत्याही व्यक्तीस प्राचार्यांच्या परवानगीशिवाय महाविद्यालयाच्या आवारात, इमारतीत परस्पर प्रवेश करता येणार नाही.

४) तासिका नसताना विद्यार्थ्यांनी ग्रंथालयात बसावे.

५) महाविद्यालयात धूम्रपान, तंबाखूजन्य पदार्थ, गुटखा अथवा नशील्या पदार्थांचे सेवन करण्यास व थुंकण्यास सक्त मनाई आहे याचे उल्लंघन केल्यास रु. २००/- दंड आकारण्यात येईल व योग्य ती कारवाई करण्यात येईल.

६) महाविद्यालयाच्या परीसरात विद्यार्थ्यास मोबाईल वापर करण्यास सक्त मनाई आहे. या सुचनेचा भंग केल्यास संबंधित विद्यार्थ्याला ५००/- रुपये दंड आकारण्यात येईल.

७) महाविद्यालयाच्या परिसरात विद्यार्थ्यांनी बेशिस्त अथवा गैरवर्तन केल्यास रु. ५००/- दंड आकारण्यात येईल व प्रवेश रद्द करण्यात येईल.

८) महाविद्यालयाच्या मालमत्तेचे कोणतेही नुकसान किंवा मोडतोड केल्यास सदर विद्यार्थ्याकडून नुकसान भरपाईची रक्कम वसूल केली जाईल व त्याचा प्रवेश रद्द करण्यात येईल.

९) विद्यार्थ्यांनी आपली वाहने निर्देशित जागेतच लावणे बंधनकारक आहे.

१०) प्राचार्यांच्या पूर्व परवानगीशिवाय महाविद्यालयात कोणतेही मंडळ स्थापन करता येणार नाही. तसेच कोणत्याही कार्यक्रमाचे आयोजन करण्यापूर्वी प्राचार्यांची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक आहे. याचे उल्लंघन केल्यास विद्यार्थ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल.

११) महाविद्यालयातील तासिका, परीक्षा, स्वाध्याय, इतर उपक्रम इत्यादींना नियमित उपस्थिती बंधनकारक आहे.

१२) ग्रंथालयातील पुस्तके, मासिके इ. ची पाने फाडल्यास मूळ किंमतीच्या दुप्पट दंड भरावा लागेल.

१३) महाविद्यालयात वार्षिक युवा महोत्सवात पुढीलप्रमाणे कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. (१) पारंपरिक दिन (२) मालवणी दिन (३) क्रीडा दिन (४) २४ डिसेंबर रोजी विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम.

या कार्यक्रमात कोणताही बदल करण्याचा अधिकार प्राचार्यांकडे राहील.

१४) प्राचार्यांच्या पूर्वपरवानगीने डिसेंबरच्या पहिल्या व दुसऱ्या आठवड्यात शैक्षणिक सहलीचे आयोजन करता येईल.

१५) वरील नियमांमध्ये बदल करण्याचा संपूर्ण अधिकार प्राचार्यांना राहील. या नियमातील बदल व वेळोवेळी करण्यात येणाऱ्या नवीन नियमांचे पालन करणे सर्वांसाठी बंधनकारक आहे.

१६) महाविद्यालय परीसरांत स्वच्छता व शिस्त राखणे सर्वांवर बंधनकारक आहे. विशेष करून सायकली/मोटरबाईक नीट रांगेत ठेवणे ही जबाबदारी विद्यार्थ्यांची राहील.

१७) कॉलेज कालावधीत ऑफ पिरीअड असेल तर लायब्ररी अथवा इनडोअर गेम जागेत बसणे सोडून आवारांत किंवा रस्त्यावर उभे रहाणे म्हणजे शीस्त मोडणे असे गृहीत धरले जाईल आणि संबंधित विद्यार्थ्यांवर दंडात्मक कारवाई केली जाईल.

१८) F. Y. B. Sc ला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ३०००/- रू. S. Y. B. Sc ला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ४०००-रू आणि T. Y. B. Sc ला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ५०००/- रू. (Development fund) देणगी स्वरूपात संस्थेला द्यावी लागेल.

सदरच्या काळात देशभक्त कै. शंकरराव गवाणकर सायन्स कॉलेजला महाराष्ट्र शासनाकडून अनुदान मिळाल्यास घेतलेले (Donation) देणगी स्वरूपातील घेतलेली रक्कम परत करण्यात येईल. यांची संबंधित विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

- प्राचार्य

## Jr. College

### ARTS

1) English
2) Marathi
3) Hindi
4) Economics
5) Geography
6) Co-operation
7) Env-Education

### COMMERCE

1) English
2) Marathi
3) Economics
4) Geography
5) Organisation of Commerce
6) Book-Keeping and Accountancy
7) Env. Education

# Senior College Bachelor of Commerce

**Programme : F. Y. B. Com. ( Seven Courses)**

**Course A) Compulsory Subject**

1) Foundation Course Paper - I
2) Business Economics Paper - I
3) Business Communication
4) Environmental Studies
5) Mathematics & Statistical Techniques
6) Accounting & Financial Management Paper - I
7) Commerce Paper - I

**Programme : S.Y.B.Com. (Seven Courses)**

**Course :**

1) Foundation Course Paper II
2) Business Economics Paper II
3) Business Law
4) Accounting & Financial Management Paper II
5) Financial Acoounting & Management Acoounting
6) Commerce Paper II :
7) Applied Component Group (Any one of the following)
   Economic System

**Programme : T.Y.B.Com. (Six Courses)**

**Course :**

1) Financial Accounting & Auditing Paper I
2) Financial Accounting & Auditing Paper II
3) Business Economics Paper III
4) Commerce Paper III :
5) Applied Component Group (Any one of the following)
   Trade Unionism and Industrial Relations.
6) Applied Component Group (Any one of the following)
   Labour Welfare & Practices.

## BACHELOR OF ARTS

**Programme : F.Y.B.A (Six Courses)**

**Courses : A) Compulsory Courses**

1) Foundation Course Paper I
2) Communication Skills In English
3) Compulsory - Marathi

**B) Optional Courses (Any Three of the following)**

1) Economics (Optional) Paper I
2) Geography (Optional) Paper I
3) Hindi (Optional) Paper I
4) Marathi (Optional) Paper I
5) English (Optional) Paper I

**Programme : S.Y.B.A (Eight Courses)**

**Course : A) Compulsory Courses**

1) Foundation Course Paper II
2) General Applied Component Group Demography.

**B) Optional Courses**

**(Two Papers of any Three optional courses Selected in F.Y.B.A.)**

A) Marathi Paper II & III
B) Hindi Paper II & III
C) Economics Paper II & III
D) Geography Paper II & III
E) English Paper II & III

**Programme : T.Y.B.A (Six Courses)**

**(Any one combination of the following)**

**A) Economics Entire**

1) Economics (Optional) Paper IV
2) Economics (Optional) Paper V
3) Economics (Optional) Paper VI
4) Economics (Optional) Paper VII
5) Economics (Optional) Paper VIII
6) Economics (Optional) Paper IX

**B) Marathi Entire**

1) Marathi (Optional) Paper IV
2) Marathi (Optional) Paper V
3) Marathi (Optional) Paper VI
4) Marathi (Optional) Paper VII
5) Marathi (Optional) Paper VIII
6) Marathi (Optional) Paper IX

**C) English Entire**

1) English (Optional) Paper IV
2) Englishi (Optional) Paper V
3) English (Optional) Paper VI-A
4) English (Optional) Paper VII
5) English (Optional) Paper VIII
6) English (Optional) Paper IX-B

**D) Economics + Geography**

Economics (Compulsory) Paper IV, V, VI

Geography (Compulsory) Paper IV, V, VI

**E) Marathi + Geography**

Marathi (Compulsory) Paper IV, V, VI

Geography (Compulsory) Paper IV, V, VI

**F) Hindi + Geography**

Hindi (Compulsory) Paper IV, V, VI

Geography (Compulsory) Paper IV, V, VI

# BACHELOR OF SCIENCE

**Programme : F. Y. B. Sc. (Sem I & Sem II)**

**<u>Compulsory Courses</u>**

**Foundation Course Paper I**

**(Any one group from the following)**

Group - A

1) Physics -
   Chemistry -
   Mathematics

Group - B

2) Chemistry -
   Botany -
   Zoology

**Programme : S. Y. B. Sc. (Sem III & Sem IV)**

**<u>Compulsory Courses</u>**

**Foundation Course Paper II**

**(Any one group from the following)**

1) Physics - Mathematics
   Physics - Chemistry
   Mathematics - Chemistry
2) Zoology - Chemistry
   Zoology - Botany
   Chemistry - Botany

**Programme : T. Y. B. Sc.**

A) Mathematics - Entire
B) Chemistry - Entire
C) Zoology - Entire
D) Physics - Entire

## CONCEPT OF CREDIT SYSEM

* Involves breaking down the curriculum into measurable units that can be combined to get a degree/diploma.
* A 'credit' is generally a 'value' used to measure a students work load in terms of learning time required to complete course units, resulting in learning outcomes.
* Credit is used in higher education to summarize and describe an amount of learning.
* The number of credits awarded to a learner is determined by Credit Value or Credit Points assigned to a particular course.
* It is a way of expressing the 'learner's workload' (Student's)
* It affords more flexibility to the learners allowing them to choose inter-disciplinary courses.
* One (01) Credit is thirty (30) learning hours.
* Credits once gained cannot be lost.

## TYPES OF CREDIT TRANSFER

- **Lateral or Horizontal:**- Credit transfer from one programme to another programme of same-level. e. g. B.A. (Mass Media) from one University to B.M.M. of Mumbai University.
- **Vertical :**- It is also referred as 'Career Laddering'. Credit Transfer from one programme to another programme of higher level. It pro vides upward mobility to the learner. e.g. Diploma in Engineering gets direct admission to the Second Year Engineering of UG Programme.
- **Intra-Institutional Credit Transfer:**- The process of Credit Transfer takes place within a Universities or Institutions called as Intra- Institutional Credit Transfer.
- **Inter-Institutional Credit Transfer:**- When the process of Credit Transfer takes place across two or more University or Institution called as Inter-Institutional Credit Transfer.
- Both type of Credit Transfer may operate across the levels i.e. Lateral & Vertical.

# FEE STRUCTURE

| Sr. No. | FEES ITEM | F. Y. | | S. Y. | | T. Y. | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | E.B.C. | PAYING | E.B.C. | PAYING | E.B.C. | PAYING |
| 1 | Tution Fee | - | 800 | - | 800 | - | 800 |
| 2 | Library Fee | 190 | 200 | 190 | 200 | 190 | 200 |
| 3 | Gymkhana Fee | 380 | 400 | 380 | 400 | 380 | 400 |
| 4 | Other Fees / Extra Curri. Acti. | 235 | 250 | 235 | 250 | 235 | 250 |
| 5 | Enrollment Fee | 220 | 220 | - | - | - | - |
| 6 | Admi. Processing | 200 | 200 | 200 | 200 | 200 | 200 |
| 7 | Utility Fee | 250 | 250 | 250 | 250 | 250 | 250 |
| 8 | Magazine Fee | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 |
| 9 | I. Card & Lib. Card | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| 10 | Group Insurance | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 |
| 11 | Student Welfare Fund | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| 12 | Development Fund | 500 | 500 | 500 | 500 | 500 | 500 |
| 13 | Vice - Chanceller's Fund | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 |
| 14 | Uni. Sports & Cultural Activity | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 |
| 15 | E - Charges | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 |
| 16 | E-mail | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| 17 | Caution Money | 150 | 150 | - | - | - | - |
| 18 | Lib. Deposit | 200 | 200 | - | - | - | - |
| 19 | Disaster Relief Fund | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 20 | N. S.S. Contribution | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| | **Total** | **2,685** | **3,530** | **2,115** | **2,960** | **2,115** | **2,960** |

* S.C./S.T./N.T./SBC. Students - Rs. 400/- (Admi Fess)

## शुल्क रचना – F. Y. B. Sc., S. Y. B. Sc., T. Y. B. Sc.

# COLLEGE FEES (ANNUAL)

| Class | Type | Enrl. Fee | Tution Fee | Comp. Pract Fee | Lib. Fee | Gym. Fee | Other Fee | Adm. proce Fee | Magazine | Id & Lib Card | Gr Insurance | S.A Fund | Utility Fee | Devp Fund | Lab Fee | E- Charge | Suvidha | V.C. Fund | UniSp & Cult Acti | Proj Fee | Disaster Fund | Caution Money | Lab. Deposit | Lib. Deposit | N.S.S. Fee | Grand Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| F.Y.B.Sc. | Paying | 220 | 800 | | 200 | 400 | 250 | 200 | 100 | 50 | 20 | 50 | 250 | 500 | 800 | 20 | 50 | 20 | 30 | 100 | 10 | 150 | 400 | 250 | 10 | 4880 |
| | EBC/PTC/STCetc | 220 | | | 190 | 360 | 235 | 200 | 100 | 50 | 20 | 50 | 250 | 500 | 675 | 20 | 50 | 20 | 30 | 100 | 10 | 150 | 400 | 250 | 10 | 3890 |
| Freeship | BCScholarship 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 200 | 0 | 50 | 20 | 50 | 0 | 0 | 0 | 0 | 50 | 20 | 0 | 0 | 10 | 0 | 0 | 0 | 0 | 10 | 410 |
| S.Y.B.Sc. | Paying | | 800 | | 200 | 400 | 250 | 200 | 100 | 50 | 20 | 50 | 250 | 500 | 800 | 20 | 50 | 20 | 30 | 100 | 10 | | | | 10 | 3860 |
| | EBC/PTC/STCetc | | | | 190 | 360 | 235 | 200 | 100 | 50 | 20 | 50 | 250 | 500 | 675 | 20 | 50 | 20 | 30 | 100 | 10 | | | | 10 | 2870 |
| Freeship | BCScholarship 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 200 | 0 | 50 | 20 | 50 | 0 | 0 | 0 | 0 | 50 | 20 | 0 | 0 | 10 | 0 | 0 | 0 | 0 | 10 | 410 |
| T.Y.B.Sc. | Paying | | 800 | | 200 | 400 | 250 | 200 | 100 | 50 | 20 | 50 | 250 | 500 | 800 | 20 | 50 | 20 | 30 | 100 | 10 | | | | 10 | 3860 |
| | EBC/PTC/STCetc | | | | 190 | 360 | 235 | 200 | 100 | 50 | 20 | 50 | 250 | 500 | 675 | 20 | 50 | 20 | 30 | 100 | 10 | | | | 10 | 2870 |
| Freeship | BCScholarship 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 200 | 0 | 50 | 20 | 50 | 0 | 0 | 0 | 0 | 50 | 20 | 0 | 0 | 10 | 0 | 0 | 0 | 0 | 10 | 410 |